

पान 3

# महासागर अमरावती

शुक्रवार दि. 13 सप्टेंबर 2024


# आरोग्य विभागासह भूमकाही लागले कामाला

■ एका पाठोपाठ एक मृत्यूने हादरले जामली आर

■ चार जणांचा आजाराने मृत्यू, तर इतर 6 वृध्दापकाळाने दगावले

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, ( दि.12 )–** चिखलदरा तालुक्यातील जामली आर या गावात गेल्या सहा दिवसात सहा जणांचा मृत्यू झाल्याने गावावर नेमका कोणता देव कोपला हे पाहण्याकरिता भूमकाही कामाला लागले आहे. तर दुसरीकडे गावात कोणकोणत्या आजाराने पाय पसरले आहे, याचा शोध घेण्याकरिता आरोग्य विभाग कामाला लागले आहे. गेल्या 21 दिवसात येथे दहा लोकांचा मृत्यू झाल्याचे सांगितले जात आहे. यामधील 6 जण वृध्दापकाळाने तर 4 जण आजाराने दगावले आहे. यातील दोन जण हे अतिसाराच्या आजाराने दगाविल्याचे सांगण्यात येत आहे.

जामली आरमध्ये आरोग्य विभागाने घरोघरी तपासणी सुरु केल्यावर जवळपास 50 हून अधिक व्यक्ती हे तापीच्या आजाराने फणफण आहेत. तर 4 लोकांना जलजन्य आजाराचे लक्षणे निघाली.

गेल्या 21 दिवसात 6 महिला व 4 पुरुष दगाविल्याने जामली आर येथील गावकरी दहशतीत आले आहे. यामध्ये माहिती काढल्यावर 6 जण हे अतिवयोवृध्द होते ज्यांना नैसर्गिक मृत्यू आला आहे. एक व्यक्ती हा अतिसाराने, एक महिला कावीळ झाल्याने, एक तरुणी ही अतिसाराने आणि एका व्यक्तीच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेल्या एका आजाराची माहिती कळू शकली नाही. असे चौघेजण हे विविध आजाराने दगाविले आहे. यामध्ये अतिसार झालेल्या तरुणीच्या कुटूंबियांनी तिला दवाखान्यात न नेता भूमकाकडे नेल्याने तिला आपला जीव गमवावा लागला. मात्र गेल्या सहा दिवसात दररोज एका व्यक्तीचा मृत्यू होत असल्याने येथील उपसरपंचांनी आरोग्य यंत्रणेला या प्रकाराची माहिती दिली. त्यानंतर मात्र आरोग्य विभागाने येथे घरोघरी तपासणी सुरु केली. यामध्ये वायरल आजाराने ग्रस्त असलेल्या गावकऱ्यांची संख्या ही अधिक असल्याचे समोर आले. गुरुवारी (दि.12) खा.बळवंत वानखडे, आ.राजकुमार पटेल, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.आसोले यांनीही परिस्थितीची पाहणी केली.



> जामली आर येथील परिस्थिती नियंत्रणात असून येथे झालेले 6 मृत्यू हे वृध्दापकाळाने झाल्याचे समोर आले आहे. काही प्रमाणात जलजन्य आजार व वायरल आजाराचे रुग्ण असल्याचे समोर आले आहे.
>
> **–डॉ.आसोले,**
> **जिल्हा वैद्यकिय अधिकारी, अमरावती.**

> गावात गेल्या सहा दिवसात एका पाठोपाठ एक झालेल्या मृत्यूने भीतीचे वातावरण आहे. त्यामूळे आरोग्य विभागासह येथील लोकांची श्रध्दा असलेल्या भूमकांनाही कामाला लावले आहे.
>
> **विनायक येवले,**
> **उपसरपंच, जामली आर ग्रामपंचायत.**






## टेब्रुसोंडा पीएचसी अलर्ट मोडवर

टेंब्रुसोंडा प्राथमिक आरोग्य केंद्र (पीएचसी) हे अलर्ट मोडवर असून येथे मोठ्याप्रमाणात औषधी साठा करण्यात आला आहे. ज्या औषधी पीएचसीमध्ये नाही, त्या औषधी ग्रामपंचायतमार्फत बाहेरून बोलावून पुरवठा केला जात आहे. या आरोग्य केंद्रा अंतर्गत 40 गावाचा समावेश आहे. 30 ते 32 हजार आदिवासी लोकसंख्येचा डोलारा या आरोग्य केंद्राच्या भरवश्यावर आहे. दररोज दोनशे ते अडीचशे रुग्ण येथे उपचार घेतात. येथे औषधांची मागणी जास्त असून पुरवठा कमी असल्याने काम करणारी आरोग्य यंत्रणा हतबल आहे.

# नांदगावपेठेत गुरे चारण्यावरून दोन गटात हाणामारी

■ एकमेकांवर लाठ्या-काठ्यांनी हल्ला

■ दोन्ही गटातील 13 जणांवर गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.12 ) –** नांदगावपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सावर्डी एमआयडीसी परिसरात गुरे चराई वरून दोन गटात हाणामारी झाली. दोन्ही गटांनी एकमेकांवर लाठ्या-काठ्यांनी हल्ला केला. दोन्ही गटांच्या तक्रारीवरून नांदगावपेठ पोलिसांनी एकूण 13 आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

रघू शिवा राठोड (22, रा. पोहरा बंदी, चांदूर रेल्वे) हे 11 सप्टेंबर रोजी सकाळी 10 वाजण्याच्या सुमारास सावर्डी येथील एमआयडीसी परिसरात गुरे चराई जात होते. दरम्यान आरोपी सलीम आणि त्याचा मुलगा समीर यांनी विनाकारण त्यांना लाठ्याकाठ्याने मारहाण केली. त्यानंतर आरोपी समीरने रघूच्या भावाला फोन केला. त्यानंतर तेथे रघूचे वडील, भाऊ व इतर सदस्य पोहोचले. त्यावेळी आरोपी सलीम, समीर, शेकू, कलीम, कलीम यांच्या मुलाने रघूच्या कुटुंबावर लाठ्याकाठ्याने हल्ला केला.

त्यानंतर जखमींना रुग्णालयात दाखल केले. जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. रघू राठोड यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी सलीम, समीर, शेकू, कलीम आणि त्यांच्या मुलाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. त्याचप्रमाणे अब्दुल कैफ अब्दुल कलीम यांनी फिर्यादीत म्हटले आहे की, तो, त्याचे वडील आणि एक मजूर तीन गुरे घेऊन शेतात चराई करीत होते. यावेळी रघु कोठेवाडी, सेवा कोठेवाडी हे त्यांच्या शेतातून गुरे घेऊन जात होते. येथून गुरे घेऊन जाऊ नका असे सांगितल्यावर रघू कोठेवाडी, सेवा कोठेवाडी यांनी इतर लोकांना बोलावून अब्दुल कैफ, त्याचे वडील व मजूर रोशन बनसोड यांना काठ्यांनी मारहाण केली. दोन गटात लाठ्या-काठ्या घेऊन हाणामारी झाल्याने सात ते आठ जण जखमी झाले. अब्दुल कैफ यांच्या फिर्यादीवरून नांदगावपेठ पोलिसांनी रघु काठेवाडी, सेवा काठेवाडी व पाच ते सहा अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## दुचाकी दुभाजकावर धडकून मृत्यू

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.12 ) –** मोर्शी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिरभाते मंगल कार्यालयाजवळ एका इसमाची दुचाकी दुभाजकावर धडकली. या अपघातात त्याचा जागीच मृत्यू झाला. नागोराव भिसन धुर्वे (47, रा. तळणी, मोर्शी) असे मृताचे नाव आहे. ही घटना 10 सप्टेंबर रोजी घडली.

बैतूल स्थित आठनेर येथील नागोराव धुर्वे हे मोर्शी येथील तळणी येथे शेतात राहतात. 10 सप्टेंबर रोजी नागोराव हे दारूच्या नशेत दुचाकीने घरी जात होते. दरम्यान शिरभाते मंगल कार्यालयाजवळ त्याचे भरधाव दुचाकीवरील नियंत्रण सुटले आणि दुचाकी दुभाजकावर जावून आदळली. या अपघातात नागोराव यांचा जागीच मृत्यू झाला. मोर्शी पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# चिमुकलीवर दोन अस्वलींनी केला हल्ला

## काळा खडक येथील घटना



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, ( दि.12 )–** प्रात: विधीसाठी बसलेल्या सहा वर्षाच्या बालिकेवर दोन अस्वलांनी हल्ला चढवून तिला गंभीर जखमी केल्याची घटना 12 सप्टेंबर रोजी सकाळी 6 वाजताच्या दरम्यान काळा खडक जनुना येथे घडली. लावण्या संदीप मदने (6 वर्ष) असे जखमी बालिकेचे नाव आहे. तिला उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

12 सप्टेंबरला नेहमीप्रमाणे लावण्याच्या कुटुंबातील सदस्य आपल्या दैनंदिन दिनचर्येत होते. संदीप मदने यांची लावण्य ही सहा वर्षाची मुलगी हेटीच्या थोड्या दूर अंतरावर प्राप्तविधीसाठी बसलेली होती. त्यावेळी नजीकच्या जंगलातून आलेल्या दोन अस्वलांनी तिच्यावर अचानकपणे हल्ला चढविला. तिच्या ओरडण्याचा आवाज ऐकून तिचे वडील संदीप मदने हे तिच्या मदतीसाठी धावले व त्यांनी आपल्या मुलीला त्यांच्या तावडीतून सोडविले. परंतु तोपर्यंत दोन्ही अस्वलांनी मुलीच्या दोन्ही खांद्यावर, गाल, मान, पोटावर व कंबरेच्या खाली चावा घेऊन तिला गंभीर जखमी केलेले होते. त्याच स्थितीत तिच्या वडिलांनी तिला पथ्रोट येथील आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये उपचारार्थ आणले. येथे तिच्यावर प्राथमिक औषधोपचार केल्यानंतर तिला उपजिल्हा रुग्णालय येथे पुढील उपचारार्थ रेफर करण्यात आले आहे. वन विभागाने सदर घटनेची तातडीने दखल घेऊन मुलीच्या वडिलांना आर्थिक मदत मिळवून द्यावी, अशी मागणी यावेळेस करण्यात आलेली आहे. सदर घटनेविषयी आरएफओ यांच्याशी बोलून आर्थिक मदत देण्यास तथा पुन्हा अशी घटना घडणार नाही. याबाबत उपाययोजना करण्यासाठी निर्देश खासदार बळवंत वानखडे यांनी दिली.

## रेल्वे क्वार्टरमधून दागिन्यांची चोरी

**अमरावती –** चांदूर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रेल्वे कॉलनी क्वार्टर येथून अज्ञात आरोपीने सोन्याची अंगठी, बदामी अंगठी, सोन्याचे धम्मचक्र, कानातले, नाकातील अंगठी व रोख 500 रुपये असा एकूण 1 लाख 23 हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. नीलेश तेलमोरे यांच्या फिर्यादीवरून 11 सप्टेंबर रोजी पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# प्रियकराने लग्नास नकार दिल्याने विवाहितेने केले विषप्राशन

## खोलापुरीगेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.12 ) –** खोलापुरीगेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका विवाहितेला प्रेमाच्या जाळ्यात अडकवून अनेकवेळा तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आला. त्यानंतर हा प्रकार तिच्या पतीलाही माहिती पडला. त्यानेही तिला लग्न करण्यास संमती दिली. मात्र त्यानंतर प्रियकरानेच लग्नास नकार दिला. त्यामुळे दुखावलेल्या विवाहितेने विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. ही खळबळजनक घटना 10 सप्टेंबर रोजी उघडकीस आली. याप्रकरणात विवाहितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी तिच्या प्रियकरासह चार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

खोलापुरीगेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रहिवासी तक्रारदार महिलेकडे परीचयातील 25 वर्षीय तरुणाने प्रेमाची विनवणी केली. त्यावर महिलेने सांगितले की, मी विवाहित आहे आणि मला मुले आहेत, मला या गोंधळात पडायचे नाही. परंतू दुसर्या दिवशी पुन्हा तो तरुण म्हणाला, माझे तुझ्यावर खरे प्रेम आहे. माझे सांक्षगंध आहे, ते तोडून मी तुझ्याशी लग्न करेन आणि तुझ्या मुलांचाही सांभाळ करीन, तू तुझ्या पतीला घटस्फोट दे. असे तरुणाने म्हटल्यानंतर विवाहित विचारत पडली. आठ दिवसांनंतर तरुणाने दुपारी महिलेला आपल्या घरी बोलावले. त्यावर महिला तरुणाच्या घरी गेली. त्यानंतर त्याने मला तुझ्याशी लग्न करायचे आहे, असे म्हणत शारीरिक संबंध प्रस्थापीत केले. यानंतर त्याने तिच्यावर अनेकदा लैंगिक अत्याचार केले. दरम्यान 9 सप्टेंबर रोजी विवाहितेचा पती बाहेरगावी गेला होता. त्यावेळी तो तरुण महिलेच्या घरात शिरला. दुसर्या दिवशी पती घरी आल्यावर त्याने घरी आलेल्या मुलाला विचारले, तेव्हा मुलाने सांगितले की, एक तरुण घरी आला होता. पतीला संशय आल्यानंतर त्याने पत्नीचा प्रियकराला घरी बोलाविण्यास सांगितले. तो घरी आल्यानंतर तू माझ्या पत्नीशी लग्न कर, मी तिला माझ्यासोबत ठेवत नाही. असे पतीने पत्नीच्या प्रियकराला म्हटले. त्यावेळी त्याने सांगितले की, मी आता तुझ्याशी लग्न करू शकत नाही, दोन वर्षांनी तुझ्याशी लग्न करेन. त्यानंतर तक्रारदार महिला 9 सप्टेंबर रोजी दुपारी 3 वाजता प्रियकराच्या घरी गेली असता त्याच्या कुटुंबीयांनी तिला मारहाण केली.

# धारणीत पकडला लाखोंचा गुटखा

## इंदौरहून अमरावतीकडे येत होता गुटख्याचा माल ■ धारणी पोलिसांची कारवाई





**महासागर प्रतिनिधी**

**धारणी,( दि.12 )–** मध्य प्रदेशातील इंदौर येथून अमरावती जिल्ह्यात दाखल झालेल्या एका ट्रकला धारणी पोलिसांनी कळमखारजवळ पकडून, त्यातील लाखो रुपयांचा गुटखा जप्त केला आहे. ही कारवाई गुरुवारी दुपारी 2 वाजताच्या सुमारास घडली असून, सायंकाळी उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती. पोलिसांनी जप्त केलेल्या ट्रक आणि मालाची अंदाजे किंमत 35 लाख रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. सुमारे 60 पोत्यांमध्ये विविध कंपन्यांचा हा गुटखा असून, एवढ्या मोठ्या प्रमाणात गुटखा जप्त केल्याने गुटखा तस्करांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाली आहे. हा गुटखा अमरावतीत कुणीकडे येत होता, ही बाब अद्याप पुढे आली नसून, धारणी पोलिस त्या दिशेने प्रयत्न करीत आहेत. जयेश मिश्रा (30, रा. इंदौर) आणि क्लिनर रामलाल मेहरा (26, रा. इंदौर) असे अटक आरोपींची नावे आहे.

महाराष्ट्र-मध्यप्रदेशच्या हद्दीतून इंदौरहून अमरावतीला गुटख्याची तस्करी होत असल्याची गोपनीय माहिती धारणी पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक अशोक जाधव यांनी त्यांच्या पथकासह कळमखार गावाजवळ नाकाबंदी केली. दरम्यान पोलिसांना एमपी 09 जीएस 9483 या क्रमांकाचा ट्रक दुपारी 2 वाजता रस्त्याने येत असल्याचे दिसले. त्यावेळी पोलिसांनी ट्रक थांबविण्याचा प्रयत्न केला. परंतू चालकाने ट्रक न थांबविता तो पळविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे पोलिसांनी ट्रकचा पाठलाग करून, त्याला काही अंतरावरच पोलिसांनी पकडले. पोलिसांनी ट्रकची झडती घेतली असता ट्रकमध्ये 60 पोती गुटखा मिळून आला. या कारवाईच्या अनुषंगाने अन्न व औषधी प्रशासनाच्या अधिकार्यांशी सपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्यांचा प्रतिसाद मिळाला नाही. ट्रकमधील गुटखा लपविण्याच्या उद्देशाने आरोपीने त्याच्यावर विद्युत साहित्य ठेवले होते. त्याखाली गुटख्याचे पोते ठेवण्यात आले होते. पोलिसांनी विद्युत साहित्य खाली काढल्यानंतर त्याखाली 25 लाखांचा गुटख्याचा माल आढळून आला. त्यामुळे पोलिसांनी गुटखा आणि 10 लाख रुपये किमंतीचा ट्रक असा एकूण 35 लाखांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई ठाणेदार अशोक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय सोळंके, पीएसआय सतीश झालटे, वाहतूक पोलीस कर्मचारी राम सोळंके, आकाश मोहिते, जगत तेलगोटे आदींनी केली. हॉट, पान बहार, पान पराग, जीएस 5 यांसह इतर कंपन्यांचा गुटखा आयशर ट्रकमधून तस्करी होत असल्याचे आढळून आले आहे. सुमारे 60 पाकिटे गुटख्याने भरली होती. ट्रक थांबवल्यानंतर पोलिसांनी चालक आणि क्लिनरला अटक केली. त्यांनी हा गुटखा इंदूरहून आणल्याची चर्चा आहे. मात्र हा गुटखा अमरावतीत कोणाकडे जात होता, हे अद्याप समोर आलेले नाही. दोघांची चौकशी सुरू आहे. पोलिसांच्या कारवाईमुळे गुटखा तस्करांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## विष प्राशन करून तरुणाची आत्महत्या

**अमरावती–** राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वसंतराव नाईक झोपडपट्टीत एका तरुणाने विषप्राशन करून आत्महत्या केली. अशोक सखाराम शिंदे (45) असे मृताचे नाव आहे. त्यांनी राहत्या घरी विष प्राशन करून आत्महत्या केली.

## जरुड आरोग्य उपकेंद्रातून एक्स-रे मशीन चोरली

**अमरावती –** जरुड आरोग्य उपकेंद्रातून एक्स-रे मशिन चोराने लंपास केली. 10 सप्टेंबर रोजी वरुड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जरूड येथील आरोग्य उपकेंद्रातून ही एक्स-रे मशीन चोरण्यात आली. चोरीला गेलेल्या मशिनची किंमत 25 हजार रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. मानसी पाटील यांच्या फिर्यादीवरून वरुड पोलिसांनी आरोपी अविनाश अरविंदसिंग खुटपडे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.


## नगरपरिषद दर्यापूर, जिल्हा- अमरावती

**जा.क्र./विद्युत/निविदा सुचना/जाहिरात/३४५८/२०२४** **प्रसिद्धी दिनांक १३/०९/२०२४**

जाहीर सुचना प्रसिद्ध करण्यात येते की, नगरपरिषद दर्यापूर शहरामध्ये सार्वजनिक सुरक्षितता, कायदा व सुव्यवस्था आबाधीत राखणे, अतिरेक्याच्या कारवाया रोखणे, धार्मिक कार्यक्रम व मिरवणुक नियंत्रण ठेवणे तसेच संवेदनशील भागावर नियंत्रण ठेवणे इत्यादी बाबी परिणामकारकरीत्या हाताळणी अत्याधुनिक यंत्रणा म्हणून सीसीटीव्ही (CCTV) संनिरीक्षण यंत्रणा बसवायची असून सार्वजनिक बांधकाम विद्युत विभागाची दरसुची यांच्या दरसंचीबाह्य (NON CSR) दराप्रमाणे मागविण्यात येत असून सर्व इच्छुक अधिकृत विक्रेते/पुरवठाधारक/कंत्राटदार/अनुभवी फर्म यांनी सिलबंद लिफाफा मध्ये दरपत्रक दिनांक १३/०९/२०२४ रोजी ३:०० वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील याची नोंद घ्यावी. या निविदेच्या पूर्ण अटी व शर्ती, अहर्ता तसेच सविस्तर निविदा सुचना न.प. विद्युत विभागात कार्यालयीन वेळेत पाहण्यास उपलब्ध आहे.

**स्वाक्षरी**
**( नंदू परळकर )**
**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद दर्यापूर**



आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४




# महासागर अमरावती

शुक्रवार दि. 13 सप्टेंबर 2024


## जंगलातील ट्रॅप कॅमेरांची चोरी

**अमरावती** - चांदूर रेल्वे पोलिस ठाण्यात हद्दीतील मोथा वनीकरण परिसरातील वनखंडातील ट्रॅप कॅमेरा अज्ञात व्यक्तीने चोरून नेला. कॅमेर्याची किंमत 14 हजार 990 रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. शिवराम माणिक राठोड यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



अंजनगाव सुर्जी-येथील विद्यानिकेतन कॉलेज मधील गणपती स्थापना.

# आठ एकरातील कपाशीवर फिरविला रोटावेटर

## खेल कृष्णाजी येथील शेतकऱ्याचाटोकाचा निर्णय

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगांव सुर्जी, ( दि.12 )**- तालुक्यातील मौजा खेल कृष्णाजी येथील शेतकऱ्याने आपल्या आठ एकर शेतात लावलेल्या कपाशी पिकात ट्रॅक्टर घालून कपाशीचं पीक नष्ट केले.

अंजनगांवसुर्जी तालुक्याची जिल्ह्यातील ओळख का ?टन हब आहे.तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रमुख पीक कपाशी आहे. यावर्षी जास्त पावसामुळे हे पीक पाहिजे त्या प्रमाणात नसतांनाच ऐन फुल, पाती व बोंड येण्याच्या काळात पाऊस सुरू राहिल्याने व सतत च्या ढगाळ वातावरणाने या पिकाचे



अतोनात नुकसान झाले आहे. वाढलेल्या मजुरी खर्चाच्या व मजुरांचे तुटवड्या अभावी रानात कपाशी पीका ऐवजी तनाचा प्रादुर्भाव पाहता. या मुळे बरेच ठीकाणी कपाशी पिक वितभर तर तण हातभर झाली आहेत. मजुरीचे दर आस्मानी भरारी घेत असताना त्यांचे तुडवड्यामुळे शेतकरी या परीस्थीती पुढे हतबल झाला आहे.

> सततच्या पावसाने व मजुर तुटवड्यामुळे शेतीची मशागत रखडली, शेतात कपाशीपेक्षा तनच वाढले. त्यामुळे मोठं नुकसान होण्याची शक्यता वाटत होती. ढगाळ वातावरण व थांबण्याचे नाव न घेणाऱ्या पावसामुळे लागणारा खर्च, पीक खर्चाचा हिशोब पाहता परवडत नसल्यामुळे नाईलाजाने टोकाचा निर्णय घेत ट्रॅक्टर फिरवावा लागला.
>
> **मो.सिद्दीक मो.सादीक,**
> **शेतकरी, अंजनगांव सुर्जी.**

लागवड खर्च तर सोडाच रब्बी हंगामातील पिक सुद्धा हातचे जाईल म्हणुन येथील युवा शेतकरी मो.साबीर, मो.सिद्दीक मो.सादीक, मोहम्मद मुजाहीद यांनी आठ एकर शेतातील कपाशी व आंतरपिक तुर या पिकावर रोटावेटर फिरविला. त्यांनी शेतीसाठी 32 हजार रुपयांचे बियाणे, पेरणीचा खर्च 12 हजार रुपये मशागतीसाठी शेतीला

30 हजार, निंदण मजुरी 30 हजार असा लाखाचे वर खर्च वाया गेला आहे. रबी हंगामात नुकसान भरपाई होइल म्हणुन टोकाचा निर्णय घेतला. एकूण तालुक्यात कपाशी ची परीस्थीती कमी अधीक प्रमानात अश्या तर्हेचीच असुन, प्रशाशणाने नुकसानग्रस्त कपाशी पीकाचे पंचनामे करुन मदत जाहीर करावी अशी मागणी होत आहे.

# गणेश उत्सव सजावट स्पर्धा

## पी.आर.पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप चे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.12 )**- पी.आर.पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप अमरावती द्वारा यावर्षी सुद्धा मोठ्या प्रमाणात 'भव्य गणेश उत्सव सजावट स्पर्धा 2024' चे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये सार्वजनिक गणेशउत्सव मंडळ, व्यावसायिक गणेशउत्सव मंडळ तसेच घरगुती गणेश उत्सव अश्या तीन विभागांमध्ये या स्पर्धेची विभागणी करण्यात आली आहे. या स्पर्धेची अधिकृत घोषणा व विमोचन पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप चे सचिव श्रेयश पोटे यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. या गणेशउत्सव स्पर्धेकरिता साधी सरळ अशी नियमावली जाहीर करण्यात आली आहे. या स्पर्धेमध्ये भाग घेऊ इच्छिणाऱ्या स्पर्धकांना पर्यावरण पूरक, सामाजिक संदेश देणारी सजावट करायची आहे, त्याचप्रमाणे त्या सजावटी चे फोटो व व्हिडीओ तयार करून आयोजकांना पाठवायचे आहे. www.prpotepatilengg.ac.in या वेबसाईटवर जाऊन गणेश उत्सव सजावट स्पर्धेच्या आयकॉन क्लिक करून गुगल फॉर्म मध्ये करायची आहे. या भव्य सजावट स्पर्धेचा कालावधी 20 सप्टेंबर 2024 पर्यंत राहील. सजावटी करीता तीन बक्षीस देण्यात येणार आहे यात प्रथम पारितोषिक रोख 11 हजार रुपये, द्वितीय पारितोषिक रोख 9 हजार रुपये, तृतीय पारितोषिक रोख 7 हजार रुपये राहणार आहे. स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या सर्वच सार्वजनिक गणेश उत्सव मंडळांना प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात येणार आहे. व्यावसायिक गणेश उत्सव सजावटी स्पर्धे करीता प्रथम पारितोषिक रोख 3100 रुपये, द्वितीय पारितोषिक रोख 2100 रुपये, तृतीय पारितोषिक रोख 1100 रुपये, त्याचप्रमाणे घरगुती गणेश उत्सव सजावटी करीता एकूण 21 रोख बक्षिसे व मानचिन्हे देण्यात येणार आहे.

## रिद्धपूर रेल्वे स्टेशनचे उद्घाटन

**अमरावती** – महानुभाव पंथीय बांधवांसाठी एक आनंददायी बातमी आहे. श्रीप्रभू अवतार दिनापूर्वी 13 सप्टेंबर रोजी दुपारी रिद्धपूरला रेल्वे स्टेशनचे उद्घाटन होणार आहे. सध्यास्थितीत येथे सर्व मेमो लोकल थांबणार असून, दुपारी 2 वाजता नरखेड-भुसावळ रेल्वे थांबणार आहे. या रेल्वेस्थानकाचा उद्घाटन सोहळा खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी अमरावतीच्या राजापेठ स्थित महानुभाव आश्रमाचे मोहन कारंजेकर बाबा, रिध्दपूरातील वाईनदेशकर मठाचे महंत वाईनदेशकर बाबा यांच्यासह रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी अमित मित्तल, अग्रवाल यांच्यासह आदी उपस्थित राहणार आहेत. या उद्घाटणाची जय्यत तयारी झाली आहे.



दर्यापूर- सिव्हिल लाईन येथील अशोकराव पांडुरंगजी सांगोले यांच्या कडील महालक्ष्मी.

# झटामझिरी गावाला तीस लाखांचे पारितोषिक

## भूजल समृध्द ग्राम स्पर्धेत कौतुकास्पद कामगिरी



**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड, ( दि.12 )**- महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी आणि संशोधन संस्था (मीत्रा) नाशिक येथे 9 सप्टेंबर रोजी अटल भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या अटल भूजल समृद्ध ग्राम स्पर्धा 2022-23 मध्ये महाराष्ट्रातील सहभागी स्पर्धक गावांपैकी राज्य, जिल्हा व तालुक्यातून विजेत्या गावाला पुरस्कार देण्यासाठी पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी अमरावती जिल्ह्यातील वरूड तालुक्यातील विजेता गाव झटामझिरी गावाला जिल्ह्यातून दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक तीस लक्ष रुपयाचा धनादेश देऊन सन्मान करण्यात आला.

अटल भूजल योजनेच्या माध्यमातून व लोकसहभागातून गावकऱ्यांनी भूजल व्यवस्थापन करून भविष्यासाठी पाण्याची बचत करणे ही काळाची गरज ओळखून शासनाने ही योजना स्पर्धेचा माध्यमातून राबवून पाण्यासाठी एक चळवळ निर्माण करण्याचा अत्यंत चांगला प्रयत्न केला आहे. याच प्रयत्नाचे फळं विजेता गाव तसेच योजना राबवण्याऱ्या गावातील नागरिकांना आपले गाव भूजल समृध्द करून पाहायला मिळाले. या कार्यक्रमास पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री दादा भुसे, खा.भास्कर भगरे, छगन भुजबळ, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ, हिरामण खोसकर, प्रधान सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग संजय खंदारे, आयुक्त पवनीत कौर आदीच्या उपस्थितीत यावेळी झटामझिरी गावाला मार्गदर्शन करणारे अटल भूजल विभागाचे मार्गदर्शक तथा वरिष्ठ भूवैज्ञानिक राजेश सावळे, डॉ. केतकी जाधव, झटामझिरीचे सरपंच हिराकांत उईके, ग्रामसेवक गणेश भंदिर्गे, सदस्य सूरदास कुमरे, भूजल मित्र पवन वाडीवे, अमरावती अटल भूजल विभागाचे माहिती शिक्षण संवाद तज्ञ प्रमोद झगेकर, कृषी तज्ञ दिनेश खडसे, जलसंधारण तज्ञ सचिन चव्हाण सारडा संस्थेचे आशीष गाडबैल, कमलेश अजमिरे, भूषण कोहळे आदींच्या उपस्थितीत हे पारितोषीक देण्यात आले.

# ज्ञानदीप पब्लिक स्कूल मध्ये तान्हा पोळा

**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा,( दि.12 )** - अचलपूर येथील जीवनपूरा येथील कृष्णाई शिक्षण व बहुउद्देशीय संस्थेद्वारा संचालित ज्ञानदीप पब्लिक स्कूल मध्ये तान्हा पोळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बैल सजावट व वेशभूषा स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मनस्वी शेंद्रे, द्वितीय क्रमांक आदिती बोबडे, तृतीय क्रमांक श्लोक मेहरे आणि प्रोत्साहन पर बक्षीस रियान्शी सोनार हीने पटकाविले. स्पर्धेचे परीक्षक



म्हणून नरेंद्र मोहोड, प्रा.प्रमोद गजभिये होते. विजेत्यांना यावेळी स्मृतीचीन्ह देण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष कृष्णाई शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.नरेंद्र राईकवार यांच्या हस्ते हे प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. डॉ.राजेश गडेकर, डॉ.दिपक गुल्हाने, राजकुमार बरडिया, महेंद्र राठी संस्थेचे सचिव डॉ.अशोक निंबूरकर, सहसचिव डॉ.रमेश नघाटे, संस्थेचे सदस्य अनिल पिंपळे व धर्मराज पवार शिक्षिका माधवी काकडे, कृतज्ञता इरम्मल्ले यांच्यासह अन्य मान्यवरांची उपस्थिती होते.

## श्रीराम बाबा संस्थानाकडून तान्हा पोळा

अचलपूर येथील जीवनपूरा येथे संत श्रीराम बाबा संस्थान व रवी वानखडे मित्र परीवाराच्या वतीने दरवर्षी तान्हा पोळा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत असतो. दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा तान्हा पोळा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला होता. श्री.संत श्रीराम बाबा संस्थान जिवनपुरा अचलपूर येथे स्वर्गीय उत्तमराव वाठ गुरूजी यांनी सुरू केलेली तान्हा पोळ्याची परंपरा मागील पंधरा वर्षांपासून रवी वानखडे मित्र परिवाराने सुरू ठेवली आहे.



तान्हा पोळा कार्यक्रमात बैल सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. बैल सजावट स्पर्धेमध्ये एकुण 417 स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी तिनं बक्षीस व पाच प्रोत्साहन बक्षीस देण्यात आले. तसेच इतर सर्व स्पर्धकांना शालेय साहीत्य, फळ, चॉकलेटचे वाटप करण्यात आले.



दर्यापूर-येथील वसंत नगर रहिवासी नंदू पाटील राऊत यांच्या कडील महालक्ष्मी.



दर्यापूर- येथील गणेश गुल्हाने यांच्याकडील महालक्ष्मी.

# राजूरा बाजार येथील मिरचीला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मागणी

- दररोज दोनशे टनांच्यावर आवक-जावक
- तीन हजाराच्या वर भाव



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड ( दि.12 )**- तालुक्यातील राजुरा बाजार येथील आंतरराष्ट्रीय मिरची बाजार सुरू झाला आहे. कृषिउपज बाजार समितीचे सभापती नरेंद्र पावडे यांनी विधीवत उद्घाटन केले. दररोज दोनशे टनाच्या वर आवक -जावक सुरु झाली आहे. सध्यस्थीत तीन हजारच्या वर भाव मिळतो आहे. फक्त संध्याकाळी चालणारी आशियातील ही एकमेव बाजारपेठ आहे. बाजारपेठेत शेतकरी, व्यापारी, तसेच इतर पुरक व्यवसायीकांची गर्दी वाढली आहे.

राजूरा बाजारमधील हिरवी मिरचीची संपुर्ण देशात ओळख आहे. देशातच नव्हे पाकिस्तान, बांगला देश येथेही येथील मिरचीला चांगली मागणी असते. नगदी पीक म्हणून शेतकरी मिरची उत्पादनाकडे वळला. यामुळे कृषी उपज बाजार समितीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मिरची मार्केट उदयास आले. तालुक्यातूनच नव्हे तर नागपूर, वर्धा जिल्ह्यातून या बाजारपेठेत मिरची विक्रीसाठी येते. येथून सगळीकडे वाहनाने मागणीनुसार मिरची पाठविण्यात येते.

### चार दिवसांपासून भावात वाढ

सुरुवातीला भाव बऱ्यापैकी होता. नंतर दोन हजारावर आला. यामुळे मिरची उत्पादक संकटात होता. दरम्यान बांग्ला देशात मागणी वाढल्याने भावात वाढ झाली. कालपर्यंत पाच हजाराच्यावर भाव मिळाला. यामुळेच उत्पादक खुश आहे. हेच भाव कायम राहावे अशी अपेक्षा उत्पादकांची आहे.

### हिरव्या मिरचीचे कच्चे पीक

मिरचीची तोडणी केल्यानंतर सायंकाळी 7 वाजता मार्केट मध्ये पोहोचले पाहिजे. पीक कच्चे असल्याने साठवून ठेवता येत नाही. यामुळे मिळेल त्या भावात मिरची विकावी लागते. यासाठी प्रक्रिया उद्योग अपेक्षित आहे. अनेक वर्षांपासून ही मागणी पूर्ण होऊ शकली नाही. ही राजकीय उणीव शेतकरी व्यक्त करतात.

### क्राडलाईन आवश्यक

वरुड शहरातून रेल्वे आहे. आठ कि. मी अंतरावर राजुरा बाजार आहे. राजुरा बाजार पासून वरुड पर्यंत रेल्वे कॉडलाईन टाकल्यास पुढील बाजारपेठेत लवकर मिरची पोहोचते. यामुळेच भावात समतोल राहील अस उत्पादक सांगत आहे.



दर्यापूर-येथील रोशन अग्रवाल यांच्याकडील महालक्ष्मी.